# राज्याच्या विकासाचे चौफेर चौकार चतुसूत्रीतून मांडणारा अर्थसंकल्प : धनंजय मुंडे



## शेती आणि शेतकरी समृद्ध करण्यास प्राधान्य तर रोजगार निर्मितीत होणार क्रांती

## महाराष्ट्राची ओळख जागतिक स्तरावर विकसित राज्य म्हणून होण्याची दूरदृष्टी दर्शविणारा अर्थसंकल्प - धनंजय मुंडे यांनी केले स्वागत

## अजित दादा असते तर... मुंडेंनी काढली आठवण

**मुंबई (प्रतिनिधी) : स्व. अजितदादांच्या विकासाच्या व्हिजनला आजचा अर्थसंकल्प समर्पित करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांनी २०४७ सालच्या विकसित महाराष्ट्राच्या पायाभरणीचा नवीन अध्याय आज सभागृहात मांडला असून महाराष्ट्राला ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याच्या दृष्टीने आजचा अर्थसंकल्प प्रगतिशील, शाश्वत, सुशासन आणि सर्वसमावेशक अशा चार स्तंभांच्या माध्यमातून राज्याच्या चौफेर विकासाची चतुसूत्री मांडणारा हा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली आहे. २५ सप्टेंबर, २०२५ पर्यंत कर्ज घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांचे २ लाख पर्यंतचे कर्ज माफ करणे तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणा ही महायुती सरकारवर जनतेने टाकलेल्या विश्वासबद्दलची कृतज्ञता आहे. या निर्णयाबद्दल सर्व शेतकरी बांधवांचे मनापासून अभिनंदन करतो, असेही धनंजय मुंडे म्हणाले.**

कृषी समृध्दी मराठवाड्याचा सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी ५४ टीएमसी पाणी नार पार मधून मराठवाड्यात आणणे यांसह विदर्भ, खानदेश व कोकणातील नदी जोड प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता व निधीची तरतूद केल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी सरकारचे विशेष आभार मानले आहेत.

ग्रामीण व शहरी भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासह, रस्ते, महामार्ग, सागरी मार्ग, मेट्रो असे अनेक प्रकल्प मंजूर करताना एक हजार पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावाला कॉंक्रिट रस्त्याने जोडण्याचा घेतलेला निर्णय हा आगामी काळात क्रांतिकारक ठरणार आहे.

प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा, बीड जिल्ह्यातील रेल्वे मार्गाचा राज्य शासन हिस्सा, तसेच स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, बीड जिल्हा रुग्णालय येथील मोठ्या विकासकामांना भरघोस निधी मिळणार आहे.

राज्य लोकसेवा आयोग व अन्य शासकीय विभागात ७५ हजार पदनिर्मिती तसेच दीड लाख उद्योजक व ५० हजार स्टार्ट अप्स यांसह रोजगार निर्मितीचे ठरवण्यात आलेले लक्ष्य हे अर्थसंकल्पाची दूरदृष्टी आणि सामर्थ्य सिद्ध करणारे आहे. कौशल्य विकासाच्या बाबतीत महाराष्ट्र जागतिक पातळीवर स्पर्धा करत असून इथली तरुणाई महाराष्ट्राची ओळख जगाच्या पाठीवर सर्वात प्रगत राज्य म्हणून करण्यासाठी पूरक व्यवस्था या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे, असेही धनंजय मुंडे म्हणाले.

आज स्व. अजितदादा स्वर्गातून पाहत असतील तर त्यांना नक्कीच आनंद वाटत असेल, असे मला वाटते. शासनाने दादांचे स्मारक आणि दादांच्या नावाने नागरी सेवा पुरस्कार सुरू करण्याचा निर्णय घेतला, याचेही मी मनापासून स्वागत करतो, असे म्हणत धनंजय मुंडे यांनी आज पुन्हा दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या आठवणी जाग्या केल्या.

# कापसी येथील पोलीस पाटील पदभरतीवर आक्षेप; EWS प्रवर्गातील अर्जांची चौकशी करण्याची मागणी

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील कापसी गावातील पोलीस पाटील पदभरती प्रक्रियेवर काही ग्रामस्थांनी कायदेशीर आक्षेप नोंदविला असून, EWS (आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक) प्रवर्गातून दाखल झालेल्या अर्जांची सखोल चौकशी करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

पोलीस पाटील पदभरती सन २०२५-२०२६ अंतर्गत कापसी ता. आष्टी जि. बीड येथील पोलीस पाटील पद हे EWS प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आले आहे. मात्र गावातील काही ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी, पाटोदा यांच्याकडे लेखी निवेदन देत या प्रक्रियेवर आक्षेप नोंदविला आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कापसी गावातील मूळ रहिवासी कुटुंबांपैकी कोणतीही व्यक्ती EWS आरक्षणाच्या निकषात बसत नसून, गावात पात्र उमेदवार उपलब्ध नाहीत. तरीदेखील काही




व्यक्तींनी महसूल विभागाची दिशाभूल करून किंवा चुकीची माहिती देऊन EWS प्रमाणपत्र मिळवले असून त्या आधारे पोलीस पाटील पदासाठी अर्ज दाखल केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

महाराष्ट्र पोलीस पाटील नियम १९६८ तसेच शासनाच्या नियमानुसार उमेदवाराने अर्ज करताना दिलेली माहिती सत्य असणे आवश्यक आहे. खोटी माहिती किंवा बनावट कागदपत्रे सादर केल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरतो, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच भारतीय न्याय संहिता अंतर्गत सरकारी कामकाजात खोटी कागदपत्रे सादर करणे हा गंभीर गुन्हा असल्याचेही ग्रामस्थांनी निदर्शनास आणून दिले आहे.

दरम्यान, कापसी गावातील EWS प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांच्या आर्थिक उत्पन्नाची, जमिनीची तसेच रहिवासी पुराव्यांची सखोल चौकशी करून खोटी माहिती आढळल्यास संबंधित अर्ज बाद करून कायदेशीर कारवाई करावी, तसेच सदर जागा पात्र उमेदवारासाठी किंवा नियमानुसार पुनःआरक्षित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी आश्रुबा नामदेव गोल्हार, बापु अंकुश गर्जे, बापु कचरू खंडागळे व यांनी केली आहे.

या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार आष्टी तसेच आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनाही देण्यात आल्या आहेत.

# आष्टी न्यायालय परिसरात वकिलास मारहाण; गळा आवळून जिवे मारण्याचा प्रयत्न

आष्टी (प्रतिनिधी):

आष्टी न्यायालय परिसरात एका ज्येष्ठ वकिलास मारहाण करून त्यांचा पंचाने गळा आवळून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना आज दुपारी घडली. या हल्ल्यात संबंधित वकिलाच्या खिशातील ५ हजार रुपये देखील बळजबरीने हिसकावून नेण्यात आले असून, याप्रकरणी पती-पत्नीविरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, आष्टी येथील ज्येष्ठ वकील ॲड. मधुकर सदाशिव झांजे (वय ६०) हे आज नेहमीप्रमाणे न्यायालयात कामासाठी आले होते. दुपारी २:१० वाजेच्या सुमारास एका प्रकरणातील तडजोडीबाबत चर्चा सुरू असताना, पक्षकार मारुती बनसोडे याने



"तुम्ही सारख्या तारखा का वाढवता?" असे म्हणत वकिलांशी हुज्जत घातली. वाद विकोपाला गेल्यावर मारुती बनसोडे याने चपलेने वकिलांच्या डोक्यात ३-४ वेळा प्रहार केले. इतक्यावरच न थांबता, त्याने स्वतःच्या गळ्यातील पंचा काढून ॲड. झांजे यांच्या गळ्याभोवती आवळून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला. यावेळी उपस्थित असलेल्या इतर वकिलांनी मध्यस्थी करून त्यांना हल्लेखोराच्या तावडीतून सोडवले. हल्ल्यानंतर मारुती बनसोडे याने ॲड. झांजे यांच्या खिशातील ५ हजार रुपये बळजबरीने काढून घेतले. यावेळी त्याची पत्नी पारुबाई बनसोडे हिने देखील वकिलांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. आरोपीने जाताना पत्नीला "तुझे झंपर फाडून टाक, आपण या वकिलांविरुद्ध विनयभंगाची केस करू" असे म्हणून खोटा गुन्हा दाखल करण्यासाठी चिथावणी दिली. तसेच, "तू कोठेही दिसलात तर तुझा खात्मा करू" अशी जिवे मारण्याची धमकी देऊन दोघेही पसार झाले. या गंभीर घटनेमुळे न्यायालय परिसरात खळबळ उडाली आहे. ॲड. मधुकर झांजे यांनी आष्टी पोलीस स्टेशनमध्ये मारुती बनसोडे आणि पारुबाई बनसोडे यांच्याविरुद्ध कायदेशीर फिर्याद दिली आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# शेतकऱ्याच्या हिताबरोबरच ग्रामीण विकासाला प्राधान्य; विकसित संपूर्ण महाराष्ट्राचे अर्थसंकल्पात प्रतिबिंब

## लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांची प्रतिक्रिया

लातूर | प्रतिनिधी

३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्जाच्या थकबाकीदार शेतकऱ्यांना अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर करत दोन लाखापर्यंत कर्जमाफी आणि नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारापर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची महत्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केली असून त्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा शेतकऱ्यांच्या हितासह ग्रामीण विकासाला गती देणारा आहे. हा अर्थसंकल्प विकसित महाराष्ट्राचे प्रतिबिंब असल्याची प्रतिक्रिया लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर केला. अजित पवार



यांच्या अपघाती निधनामुळे महाराष्ट्राच्या विधिमंडळात अधिवेशनात आज शुक्रवारी दुपारी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याचा अर्थसंकल्प मांडला. अजित पवार आज आपल्यात नाहीत त्याच्या जाण्यामुळे निर्माण झालेली पोकळी भरून निघू शकत नाही अजितदादा यांना श्रद्धांजली म्हणुन त्यांच भव्य स्मारक उभारलं जाईल. त्यांच्या नावाने नागरी पुरस्कार सुरु केला जाईल असे देवेंद्र फडणवीस यांनी बोलून दाखवले.

सभागृहात अर्थसंकल्प सादर करताना देवेंद्रजी फडणवीस यांनी चार वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील. एक हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना कॉंक्रिट रस्त्याने जोडण्यात येईल, आगामी दोन वर्षांत महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात, पाणंद रस्त्यांना मान्यता, मुख्यमंत्री ग्रामीण पशूधन उद्योजक योजनेतून महिला गोपालक, शेळी पालकांसाठी विशेष योजना राबविण्यात येईल. ३२ हजार ७५६ कोटी मुख्यमंत्री सौर उर्जेसाठी खर्च करण्यात आले असून यावर्षी २० हजार कोटींची तरतूद केली आहे .मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत गिनीज बुकमध्ये महाराष्ट्राची नोंद झाली अशी माहिती दिली.

# डॉ.शिवानी बोडखे यांची कडा प्रा.आ. केंद्रात 'वैद्यकीय अधिकारी' पदी निवड

आष्टी | प्रतिनिधी

ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला आता एका उच्चशिक्षित आणि संवेदनशील डॉक्टरची साथ मिळाली आहे. माहेरून निर्भीड पत्रकारितेचा, तर सासरहून ज्ञानदानाचा समृद्ध वारसा लाभलेल्या डॉ.शिवानी बबिता उत्तम बोडखे यांची कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये 'वैद्यकीय अधिकारी' (Medical Officer) म्हणून नुकतीच नियुक्ती झाली आहे.त्यांच्या या निवडीमुळे कडा शहरात आनंदाचे वातावरण असून सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.डॉ. शिवानी यांना समाजसेवा आणि शिक्षणाचे बाळकडू घरातूनच मिळाले आहे. आष्टी तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार तसेच 'दैनिक झुंजारनेता'चे उपसंपादक उत्तम बोडखे यांच्या त्या सुकन्या आहेत. तर, कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांच्या त्या स्नुषा (सून) आहेत. एका बाजूला लेखणीतून लोकजागृती करणारे माहेर, तर दुसऱ्या बाजूला शिक्षणातून पिढ्या घडवणारे सासर, अशा या दुहेरी परंपरेला आता डॉ. शिवानी यांच्या रूपाने वैद्यकीय सेवेचे कोंदण लाभले आहे. जनसेवेचे हे व्रत त्या अत्यंत निष्ठेने पुढे नेतील,असा विश्वास व्यक्त होत आहे.

### ■ अत्यंत प्रेरणादायी शैक्षणिक वाटचाल

डॉ.शिवानी यांची शैक्षणिक कारकीर्द पहिल्यापासूनच



अत्यंत तेजस्वी राहिली आहे.त्यांचे प्राथमिक शिक्षण आष्टी येथील जि. प. प्रा.शाळा मुर्शदपूर येथे, तर माध्यमिक शिक्षण आष्टीतील पंडित नेहरू विद्यालय आणि लातूरच्या देशी केंद्रीय विद्यालयात झाले. लातूर येथे दहावीच्या परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला होता. त्यानंतर लातूरच्याच प्रतिष्ठित राजर्षी शाहू महाविद्यालयातून अकरावी आणि बारावीचे शिक्षण पूर्ण करून त्यांनी चिपळूण (रत्नागिरी) येथील बी.के.एल. वालावलकर मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएससाठी (MBBS) प्रवेश मिळवला.विशेष अभिमानाची बाब म्हणजे, एमबीबीएसच्या सर्वच वर्षांच्या परीक्षांमध्ये त्यांनी कॉलेजमध्ये 'टॉपर' राहण्याचा बहुमान मिळवला आहे. नुकतीच त्यांची आंतरवासिता (Internship) पूर्ण झाली असून त्यांनी यशस्वीरित्या पदवी प्राप्त केली आहे.

### ■ रुग्णसेवेचा ध्यास आणि भविष्यातील वेध

कडा आणि परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळवून देण्याच्या दृष्टीने त्यांची ही नियुक्ती अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे.त्यांच्या उच्च शिक्षणाचा, वैद्यकीय कौशल्याचा आणि संवेदनशील दृष्टिकोनाचा थेट फायदा परिसरातील सामान्य आणि गरीब रुग्णांना नक्कीच मिळेल. भविष्यात वैद्यकीय क्षेत्रातील पदव्युत्तर पदवी (PG) घेऊन रुग्णांची अखंड सेवा करण्याचा आपला मानस असल्याचे डॉ. शिवानी बोडखे यांनी आवर्जून सांगितले.

डॉ.शिवानी बोडखे यांच्या या अभिमानास्पद यशाबद्दल परिसरातील सर्वच राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, वैद्यकीय व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांकडून बोडखे आणि विधाते कुटुंबाचे अभिनंदन केले जात आहे. त्यांच्या भावी वैद्यकीय वाटचालीस सर्वांकडून शुभेच्छा दिल्या जात आहेत.



# संत शिरोमणी काशीबा महाराज पुण्यतिथी गुरव समाजाच्या वतीने उत्साहात साजरी

**परळी वैजनाथ :** संत शिरोमणी काशीबा महाराज यांची पुण्यतिथी हनुमान नगर, पांढरीचा मळा, परळी वैजनाथ येथे गुरव समाजाच्या वतीने मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संत शिरोमणी काशीबा महाराज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन व आरती गुरव समाजातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी संतांच्या कार्याचे स्मरण करत त्यांना भावपूर्ण अभिवादन केले.

पुण्यतिथीनिमित्त शुक्रवार, दि. ६ मार्च रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भजन, कीर्तन तसेच नामस्मरण आदी कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत शिरोमणी काशीबा महाराज यांच्या मंदिराचे भूमिपूजन श्रीफळ वाढवून विधिवत करण्यात आले. या प्रसंगी गुरव समाजातील महिला-पुरुष, भाविक भक्त तसेच परळी शहरातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर संत नामाच्या गजराने आणि भक्तिभावाने भारावून गेला होता.

दरम्यान, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परळी गुरव समाज युवक तालुका अध्यक्ष स्वप्निल (गणेश) पुजारी, राजेभाऊ अण्णा पुजारी, अनिल पुजारी, पपन पुजारी, बाळू पुजारी, सुरेश पुजारी, रमेश पुजारी, गणेश पुजारी, बालाजी पुजारी, सचिन पुजारी, निलेश पुजारी, संतोष पुजारी, बालाजी पाटील, अशोक पुजारी, आकाश पुजारी, राहुल पुजारी, प्रशांत पुजारी, शंकर पुजारी, गौरव पुजारी, वेदांत पुजारी, राम पुजारी, वैभव पुजारी, अभिषेक पुजारी, संदीप पुजारी, प्रदीप पुजारी, अरविंद पुजारी, शुभम पुजारी, सौरभ पुजारी, विजय पुजारी आदींसह गुरव समाजातील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.